# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

दिनांक 27/07/2021 (मंगळवार)

(दुपार)

---

### जबरी संभोग

पो.स्टे. उमरेड :– दिनांक 25/07/2021 चे 18:00 वा. ते 18.30 वा. चे सुमारास वय 45 वर्षीय पीडित हि मानसिक रूग्ण असुन ती आपले घरी हजर असता आरोपी नामे– बबलु झिंगरू दिघोरे, वय 45 वर्षे, रा. कावरापेठ, उमरेड याने ती मानसीक रूग्ण असल्याचे माहित असुन सुद्धा ती संमती देण्यास असमर्थ असतांना देखील आरोपीने तिचेवर जबरी संभोग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम 376(2)(जे),(एल), 450 भा.द.वि. सहकलम 3(1),(डब्लु)(i),(ii),3(2)(व्ही–ए) अनुसुचित जाती/अनुसुचीत जमाती अत्याचार प्रतिबंधक अधि. 1989. सुधारीत 2015 कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आले असून गुन्हयाचा पुढील तपास श्री. भिमराव टेळे, उपविभागीय पोलीस अधिकारी उमरेड विभाग उमरेड मो.नं. 9923388766 हे करीत आहे.

### फसवणुक

पो.स्टे. एमआयडीसी बोरी :– अंतर्गत 3 कि. मी. अंतरावरील टाकळघाट येथे दि. 18/07/2021 चे 19.00 वा. ते 23/07/2021 चे 15.07 वा. दरम्यान येथे फिर्यादी नामे– प्रबल खुशाल मुन, वय 22 वर्ष, रा. टाकळघाट, ता. हिंगणा, जि. नागपूर याचा नोकीया 6.2 ॲनड्राईड मोबाईल वर टेक्स मॅसेज अज्ञात आरोपी रा. वाईल्ड मंत्रा,न्यु दिल्ली ईओडब्लु दिल्ली भारत याच्या मोबाईलने आलेल्याने लींकला टच करुन मॅसेज उघडला असता फिर्यादीचा मोबाईल फोन अचानक बंद होवुन सुरु झाला नाही. दुसरे दिवशी दिनांक 19/07/2021 रोजी सकाळी मोबाईल आपोआप सुरु झाला व सर्व सामान्यपणे मोबाईल सुरु होता. दिनांक 23/07/2021 रोजी रात्री फिर्यादीची मैत्री नामे– सुप्रीया घोष रा. आसाम हिने गुगल पे वरुन 2,500/–रु. ॲकाउन्ट मध्ये टाकल्याचे फोनवरुन सांगुन पैसे आले किंवा कसे चेक करण्यास सांगीतले असता फिर्यादीने त्याचे स्टेट बॅक ऑफ इंडीया, बुटीबोरी शाखेचे ॲकाउन्ट चेक केले असता दिनांक 23/07/2021 पर्यंत एकुण 09 ट्रान्झेक्शन व्दारे कि. 2,19,479/– रुपयाची ऑनलाईन फसवणुक झाल्याची दिसून आली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे आरोपीविरुध्द कलम 420 भा.द.वि. सहकलम 66, 66 सी, 66 डी माहिती तंत्रज्ञान कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पो.नि. श्री. ठाकरे मो नं 9923466728 हे करीत आहे.

## अपघातात मृत्यू

पो.स्टे. देवलापार :– अंतर्गत 19 कि. मी अंतरावरील मौजा चोरबाहुली मुकनापुर शिवार दिनांक 26/07/21 चे 11.00 वा. ते 11.30 वा. दरम्यान घनश्याम भगवान बाजनघाटे(जखमी) रा. चिंचदा व राजु महादेव सोनगेंदे, वय 46 वर्ष, रा. मसला (मृतक) हे त्यांचे एम.एच– 40/एव्हि– 8770 क्रमांकाच्या मोटरसायकलने चोरबाहुली कडे जात होते. त्यादरम्यान समोरून येणा–या अज्ञात पिकअप वाहन चालक आरोपीने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन एम.एच– 40/ एव्हि– 8770 क्रमांकाच्या मोटरसायकला समोरून धडक दिली. या अपघातात मोटरसायकल चालक नामे– राजु सोनगेंदे यांचा मृत्यु झाला तर घनश्याम बाजनघाटे हे जखमी झाले.

सदर प्रकरणी सर तर्फे सहायक फौजदार विष्णु जगनित यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. देवलापार येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 337, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोधे घेणे सुरू असूप सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनी बोरकुटे पोस्टे देवलापार मो नं 9545667223 हे करीत आहे.

## अकस्मात मृत्यू

पो.स्टे. कळमेश्वर :– अंतर्गत 14 कि. मी. अंतरावरील मौजा उबाळी शिवार वासुदेव कारभारी यांचे शेतात येथे दिनांक 26/07/2021 चे 12.30 वा. ते 13.00 वा. दरम्यान फिर्यादी यांचा मुलगा नामे– श्रीकांत गुलाब नागपुरे(मृतक), वय 5 वर्ष हा लॉनवर खेळत असतांना पळत जावुन लॉनवर फिरवायच्या रोलरला हात लावत असतांना तोल जावुन रोलरच्या खाली आल्याने मरण पावला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– गुलाब पुंडलिक नागपुरे, वय 37 वर्ष, रा. उबाळी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सहायक फौजदार श्री चव्हाण हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर